# प्रभु तरुण

| वर्ष ५६ | अंक ०५ | मुंबई | १६ जानेवारी, २०२३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## सोहळा आनंदाचा... भरून जाऊ दे रे।।

—सुहासिनी कीर्तिकर

हासत, सजत, वाजत गाजत दिवाळी आली... गेली. आत्ता आत्ता गेल्या महिन्यात शिरशिरत्या थंडीत नाताळबाबा आला, आनंदाने भरभरून भेटी देऊन गेला. त्या भेटींचे बोट धरून हलकेच नववर्ष आले. २०२३ सुरू झाले. किती मज्जा आहे नं? आपण सर्व धर्मांचे सण साजरे करतो. कारण? कारण एकच. आपली स्वागतशील वृत्ती आणि आनंद भरभरून देण्याघेण्याचा जन्मत: घेतलेला वसा. हा वसा आपल्या ज्ञातीसंस्कृतीने ओटीत घातला आहे. आपण उगाचच तोंड वाकडे करीत कुणावर तोंडसुख घेत नाही. प्रत्येक दिवस हा नवीन जन्मोत्सव असतो आपल्यासाठी. खा, 'प्या', आनंदी रहा - हा मंत्र कुणी नव्याने शिकवावा लागत नाही आपल्याला. हो नं? नाही तर काही माणसं असतात अशी की सण समोर उभा आहे तर उगाच चिंता करतात. ''अरे बापरे! आता करा स्वयंपाकघरात काहीबाही. खरेदी म्हणजे तापच. शेजारीपाजारी जोरजोराने हसता नाचताहेत. काही आवाजाचे भान आहे की नाही!''... वगैरे वगैरे बरेच काही. काहीजण तर स्वत:च्या मुलांवरही शिस्तीच्या नावाखाली लांब चेहरा करून रहाण्यासाठी बंधने घालतात. लहानपणी एक बाहुलीवरची मायदेवांची कविता होती अभ्यासाला. ती हलत नाही, बोलत नाही. 'साडीचोळी ठेवी बाई जशीच्या तशी' अशी 'शहाणी कशी' ती बाहुली. पण मुले बाहुलीसारखी एका जागी कशी बरं बसणार स्वस्थ? ती 'शहाणी' असतात म्हणूनच चळवळ-वळवळ करतात. आपल्या सावलीशीही 'तळ्यात मळ्यात' खेळतात. पण काही लांब चेहराच करून बसणाऱ्यांना हे खेळणे म्हणजे 'सगळा वेड्यांचा खेळ' वाटतो. त्यांना हे कधीच कळत नाही की 'वेडात दौडले' कीच जगणे सार्थ होते. खूप खूप हसले कीच जगणे संपन्न होते. खूप खूप आनंदी राहिले कीच आपला आनंद दुसऱ्यांना देता येतो आणि मनापासून 'सर्वे सुखिना भवन्तु।' म्हणता येते. तर; सांगायची गोष्ट अशी की प्रत्येक पाठारे प्रभु हा अशा वृत्तीचा, आनंदी आणि आनंद वाटणारा आहे. प्रत्येक दिवस हा आपल्यासाठी आनंद साजरा करण्याचे निमित्त असते. म्हणून तर आपण सर्वधर्मीय सण साजरे करतो. आनंद देतो-घेतो. तर आता या आनंदाचे निमित्त काय?.. तर हे येणारे नवीन वर्ष.

हे नवीन वर्ष प्रभुतरुणसाठी फारच महत्त्वाचे आणि आनंदाची कारंजी उंच उंच उसळविणारे. शताब्दीवर्ष. या वर्षाचे महत्त्व आपल्याला एखाद्या सणासारखेच. या नवीन वर्षात म्हणूनच प्रथेप्रमाणे नवीन सदरे सादर होताहेत. डॉ. सुमन नवलकर, श्री. हेमंत तळपदे, श्री. नंदकुमार विजयकर यांनी नवीन सदरांसाठी आपल्या कलमांना (लेखणीला) पालवी फुटेल तजेलदार; याची नव्याने हमी देण्याची गरजच नाही. त्यांचे सदर लेखन वाचून आपल्या वाचकमनाला पालवी फुटणार आहे. या जुन्या जाणत्या सिद्धहस्त लेखकांसोबत सिद्ध झालीय सौ. त्वरिता संजय दळवी. तुलनेने तरुण वयाची म्हणून तरुण नजरेने भवताल पाहणारी. ती काही काळ आपली कार्यकारी संपादिकाही होतीच म्हणा. पण आता नव्याने लेखणी सरसावत वाचकांना ती काही दमदार लेखन देणार आहे. याशिवाय अधूनमधून आपले विनय त्रिलोकेकर आहेतच. इतरही अनेकजण तत्परतेने पुढे येणारे आहेत. पाहू या... या वर्षी या सगळ्या नाताळबाबांनी नववर्षासाठी काय आणि कोणती भेट वाचकांच्या आनंदपोतडीत टाकली आहे.

आनंदपोतडी तशी प्रत्येकच माणसाजवळ असते. नाताळबाबा जशी आपल्या पाठीवर खूप खूप भेटींची भली मोठ्ठी पोतडी घेऊन हिमशुभ्र रस्त्यांवरून आनंदाने गात फिरतो ना; अगदी तश्शीच. 'तिन्ही लोक आनंदाने भरून जाऊ देरे!' हीच त्यामागची भावना असते. पण काही वेळा काही माणसांना या पोतडीचे वजन पेलवत नाही. काही जणांना ती चक्क दु:खांचीच पोतडी वाटते. ते त्याने वाकून जातात, रडकुंडीला येतात. कारण त्यांना 'सुख आले दारी' हे कळतच नाही ना! आता पहा; आपल्या हसऱ्या घरात 'हसरे तारे' असणे आणि त्यांच्यासाठी छान छान भेटींची नाताळबाबाच्या वेषात पोतडी भरणं हे कामच किती किती सुखावह! पण नाही! मूळात घरातल्या त्या लहान रूप हसरे असणाऱ्या बाळकृष्णांना आपण किती किती जोखडांनी उखळाला बांधून ठेवलेलं असते बरे! जऽऽरा कुठे खेळते मूल घरात दंगा करू लागले तर त्याला अभ्यासाचा पंगा दाखवला जातो. फक्त शाळेचाच अभ्यास नव्हे बरे का! त्याला ट्यूशन लावली जाते. परीक्षेत नव्वद टक्के मिळाले तरी ब्याण्णव का नाही; जाब विचारला जातो. परत इतर काही क्लासेस असतातच. फूटबॉल क्लास, पोहोण्याचे वर्ग, बॅडमिंटनचा कोर्स, नृत्यशिकवणी, गाण्याचा ट्यूशनरियाज... असं किती किती; अन् काय काय! वर घरच्या मोठ्यांचा आरडाओरडा. 'आम्हाला लहानपणी अशा सुविधा नव्हत्या. तुम्हाला पोरांनो आज मिळताहेत; तर कदर नाही.' किती पोरकट वाद किंवा किती वाह्यात् युक्तिवाद हा! प्रत्येकाने आपापले लहानपण आठवावे की! क्लास, ट्यूशन नसेल तेव्हा. पण गडकऱ्यांचा 'सकाळचा अभ्यास' आपल्यापैकी प्रत्येकानेच केलेला असतो. सवलतींच्या फटी शोधलेल्या असतात. मैदानी खेळ खेळलेले असतात. किती तरी गोष्टींची मोठ्यांच्या नकळत धम्माल केलेली असते. या आनंदाला सीमाच नाही हो! पण हे आठवतच नाही सोयीस्करपणे काहींना. मग आनंद त्यांना त्रास वाटतो. मोकळेपणा हा थिल्लरपणा वाटतो. सुट्टी म्हणजे वैतागवाडी वाटते. पाठीवरचे आनंदाचे पोते त्यांना विरूप कुबड वाटते. दु:खाच्या कल्पनेने त्यांच्या पाठीला पोक येते, ते जगताना पार वाकून जातात. 'न्यूरोथियालॉजी'चा त्यांना गंधच नसतो म्हणून असे होते. प्रत्येक क्षण हा आनंदाचा कण आहे. तो प्रसन्नपणे वेचला पाहिजे. प्रत्येक सण हा आनंदाची पोतडी आहे. ती लुटली पाहिजे. तरच 'हे जीवन सुंदर आहे' ह्याचा साक्षात्कार होतो. 'प्रभुतरुणा'चे नवे लेखक, नाताळबाबा या अंकापासून येताहेत ते असा साक्षात्कार घडवायलाच.

ही आनंदपोतडी प्रभुतरुणाच्या वाचकांची नेहमीच भरलेली आणि समृद्ध असतेच. दिवाळी अंकाने तो सुखद प्रत्यय दिला आहेच. त्यातल्या काही सजग वाचकांनी आपल्या प्रतिक्रियाही कळविल्यात. अशा प्रतिक्रियांमुळे आनंदाची परस्पर देवाणघेवाण होऊन आमच्या तरुणाईचा उत्साह वाढतो. आनंदाला समाधानाचे भरते येते. तेव्हा अशा प्रतिक्रिया वाचकहो; देत चला नेहमीच. त्यामुळे समृद्धीला कधीच आहोटी लागणार नाही. वाचनाचा आनंद लुटा. बालसुलभ वृत्तीने प्रगट करा आणि प्रौढ-प्रगल्भ जाणीवेने त्याची देवाणघेवाण होऊ द्या.

ती होणारच याची खात्री आहे. कारण तो आपला आनंदी रहाण्याचा वसाच आहे. जन्मसिद्ध. तेव्हा घेतला वसा टाकू नका, उतू जाऊ द्या; मात्र मातू नका. संवादातून - परस्पर संवादातून तो अधिकाधिक वाढू द्या. 'प्रभुतरुण' आपलाच म्हणणाऱ्या वाचकहो; तुम्हा सर्वांना नववर्षाच्या मनापासून शुभेच्छा. या शुभेच्छा लेखकांतर्फेही आहेत हे 'सांगणे न लगे'. नववर्ष तुम्हाला प्रभु तरुणाच्या सहवासात आनंदाचे, समृद्धीचे, सुख समाधान आणि शांतीचे जावो!

तर भेटूया मंडळी, पुढील अंकी. नवचैतन्य घेऊन. नवनवीन आनंददायी बातम्या घेऊन. परस्परभेटीचा सोहळा साजरा होण्यासाठी; करण्यासाठी. आनंदाला आनंदाचे ओवाळण्यासाठी!

*

**काही नवे - काही जुने**

# सल्-शिरा

**-नंदकुमार विजयकर**

'प्रत्येक सुगरण बायकोच्या मागे एक नवरा उभा असतो' असं कुणीतरी म्हटलं आहे. मित्र हो, हे मीच म्हटलं आहे. कारण पु.लं.नी आधीच सांगून ठेवलं आहे - 'काय म्हटलंय यापेक्षा कुणी म्हटलंय यालाच लोक जास्त महत्त्व देतात'. कुणीतरी म्हटलंय असं बोललं की लोक लगेच कान टवकारतात. आता 'प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री उभी असते' हे प्रसिद्ध वचन आपणां सर्वांस ठाऊकच आहे. या वचनाला अनुसरून मी जेव्हा वरील विधान केलं तेव्हा बरेच जण थोडेफार हसले. काहींनी टवाळी केली. मी काय बोलतोय याकडे दुर्लक्ष केलं. महिला वर्गानं तर माझा कडाडून निषेध केला. तेव्हा मित्रहो, यामागे माझी भूमिका काय आहे हे समजावून सांगण्याची वेळ आली आहे.

याची सुरुवात कशी होते ते मी सांगतो. नवीन नवीन लग्न झालेलं असतं. राजा-राणीचा संसार. फक्त तो आणि ती. त्याला हौस फार आणि तिला उत्साह भारी. वर लग्नात तिच्या आईनं तिला कानमंत्र दिलेला असतो. 'हे बघ, नवऱ्याला खूश ठेवायचं असेल, तर अधून-मधून त्याला नवीन नवीन पदार्थ खायला घालत जा हो.' मग काय, 'आई वाक्यम् प्रमाणम्'. घरात, फ्रॉम द डे वन् म्हणजे अगदी पहिल्या दिवसापासून, पाककलेचे नवीन नवीन (भयानक) प्रकार चालू होतात. या नव्याच्या सोसापायी किचनमध्ये नाना प्रकारची उपकरणं, आयुधं व यंत्रं यांची एकच भाऊगर्दी होते. तराजू काय, मोजमापं काय, चिमटे, सळ्या, भांडी, भट्टी काय विचारू नका. सोबतीला पाककलेवरची चित्रविचित्र रंगीबेरंगी पुस्तकं. त्यांचे आकारदेखील वेगवेगळे. काही अशी हातभर रुंद, तर काही पॉकेट साईज. आता पुस्तक खिशात ठेवून का कोणी स्वयंपाक करतं? त्यात प्रकार ते केवढे. नॉर्थ इंडियन, साऊथ इंडियन रेसिपी. वेज, नॉनवेज. पंजाबी तंदूर, चायनीज, थाई, मेक्सीकन. हजार प्रकार. 'आजारी माणसाचे पथ्य पाणी' यात सुपाचे साठ प्रकार दिले होते. सुपावरनं आठवण झाली. रात्रीच्या जेवणाच्या वेळी बायकोनं नवऱ्यापुढे सुपाचा एक मोठा वाडगा आणून ठेवला. आता हे काय आहे म्हणून विचारायची सोय नाही. पुढ्यात जे येईल ते गिळायचं. त्याने सुपाचा एक सिप-एक घोट, घेतला आणि त्याच्या डोळ्यात पाणी तरारलं. ती घाबरली.

''अगं बाई, तिखट लागलं की काय? अहो, यात अजिबात काळीमिरी टाकली नव्हती.''

''अगं, तसं नाही. आजीची आठवण आली.''

''आजीची, ती कशी काय बाई?''

''अगं, लहानपणी शाळेला सुट्टी पडली की आम्ही गावाला आजोळी जात असू. त्यावेळी आमच्यापैकी कुणीही आजारी पडलं की आमची आजी अशीच ऊन-ऊन, मऊ-मऊ पेज खाऊ घालायची.''

''शी.....''

''काय झालं?''

''अहो, पेज काय म्हणता? सूप आहे ते सूप. मलिगटानी सूप म्हणतात त्याला.''

आता त्याला हे कळत नाही की 'मलिगटानी' आपल्याच मानगुटी का? असं दुसऱ्यांदा त्याच्या डोळ्यातून पाणी आलं. पहिलं, जेव्हा तो हनीमूनला गेला होता तेव्हा त्या राजधानी एक्सप्रेसमध्ये असं सूप प्यावं लागलं होतं. आईस्क्रीम, पुडिंग, चॉकलेटस्, केक्स यांवर एक स्वतंत्र पुस्तक. या पुस्तकांच्या किंमतीपण केवढ्या अफाट. दोन-चार पानांचं रेसिपी बुक. किंमत मात्र चारशे रुपये. आता या पुस्तकाबरहुकूम पदार्थ बनवून खाल्ल्याने कुणाची पोटं भरत असतील तर भरोत बापडी. पण त्यांच्या गलेलठ्ठ किंमतीमुळे पुस्तक विक्रेत्यांची, प्रकाशकांची पोटं मात्र तुडुंब भरत असतील. आता हे सर्व कमी पडतं की काय, म्हणून वर कुठल्यातरी मासिकातली, वर्तमानपत्रातली कात्रणं. त्यांचा हा ढीग साठलेला. एखादा कागद घेतला रे घेतला की,

'अहो तो कागद फाडू नका.''

''अगं, फाडतोय कोण?''

''अहो त्यात ना माझ्या केकची रेसिपी आहे.''

''केकची रेसिपी? आणि हा कागद असा खाली पडलेला''

''असू दे. मुद्दामच ठेवलाय. हातालगत वेळेवर सापडतो.''

आता त्या कागदातला केक त्याच्या घशाखाली कधीही उतरलेला नसतो आणि म्हणूनच तो कागद फाडायचा त्याने तीनदा प्रयत्न केलेला असतो. पण दर वेळी तो 'वेळेवर सापडतो.' एकदा तो असाच वेळ जात नाही म्हणून चॉकलेटची रेसिपी वाचत होता. अथ्पासून इतिपर्यंत त्याने ते सर्व वाचून काढलं. सर्व व्यवस्थित होतं, पण शेवटी एक तळटीप होती. 'आणि मग हाताने चॉकलेटचे वेडेवाकडे तुकडे करावेत म्हणजे ते घरी केल्याप्रमाणे वाटेल.' आता या सूचनेला काही अर्थ होता का? तुकडे हाताने केले काय किंवा आणखी कशाने, त्याच्या चवीत काय फरक पडणार होता? बायकोनं केलेलं चॉकलेट तोंडात टाकल्यावर आपण चॉकलेट खातोय की मेणबत्ती चघळतोय ते काही कळत नाही. थोडक्यात काय, घराची अगदी धर्मशाळा बनवलीय असं आपण म्हणतो ना? तद्वत स्वयंपाकघराची अगदी प्रयोगशाळा बनवलेली असते.

सुरुवातीला तो गाफील असतो. नवी नवलाई असते. मुळात हे काय चाललंय ते त्याच्या लक्षातच येत नाही. पण हळूहळू हे प्रकरण त्याला जड जाऊ लागतं. आता नवरा थकून-भागून घरी आला की त्याची एक माफक अपेक्षा असते. आल्या आल्या त्याला अर्धा-पाऊण कप गरम गरम चहा मिळावा व सोबत कांदापोहे, शिरा, उपमा असं काहीतरी मिळावं. अर्थात हे सर्व असायलाच पाहिजे असा त्याचा आग्रह नसतो. पण चहा मात्र त्याला हवा असतो. आता काय होतं ते पहा. नवरा असा घरी येतो. रहदारीची घाई-गर्दी, प्रवासातील धावपळ याने थकलेला असतो. घरी येऊन दरवाजावरची बेल वाजवतो. ती प्रसन्नवदने त्याचं स्वागत करते. तो मात्र खाली मान घालून तिच्याकडे न पाहताच आत शिरतो. पुढे काय वाढून ठेवलंय याची त्याला कल्पना असते. तो बूट काढतो, बॅग फेकतो, पंखा लावतो आणि हाश्-हुश् करीत बसतो; न बसतो तोच एक नवीन पदार्थ घेऊन ती त्याच्यासमोर येते. डिश टेबलावर ठेवून, त्याच्यासमोर तळहातावर हनुवटी टेकवून-अगदी म्हणजे हा ते कधी खातो आणि वा; उत्तर असं तोंड भरून आपलं कौतुक कधी करतो याची वाट बघत बसते. तो बराचवेळ बायकोकडे बघतो. मग डिशकडे बघतो. असं आलटून पालटून त्याचं पाहणं चालू असतं. त्या बशीत धड त्रिकोणी नाही की चौकोनी नाही असं काहीसं असतं आणि ते पाहून त्याच्या पोटात गोळा येतो. कारण मंडळी, मागचा अनुभव फारसा चांगला नसतो.

काहीतरी वेळ काढायचा म्हणून तो तिला विचारतो, ''काय गं, याचं नाव काय?''

''याचं नाव ना, सल्-शिरा.''

''शिरा?''

''शिरा नाही काही, सल्-शिरा.''

छान. सल्-शिरा. आता ते थोडसं वड्यासारखं आणि बरंचसं समोशासारखं दिसत असतं आणि नाव मात्र शिरा. हे गोड आहे का तिखट, थंड आहे की गरम, कडक आहे का नरम असे नाना प्रश्न त्याच्या डोक्यात घोळत असतात आणि जसजसा त्याला वेळ लागतो तशी तिची चुळबूळ वाढते. शेवटी ती विचारतेच,

''काय असेल सांगा पाहू?''

आता त्या पदार्थाकडे पुन्हा पुन्हा पाहूनदेखील त्याची जिऑमेट्री कळत नाही की जिऑग्राफी कळत नाही. तर ते खाल्ल्याशिवाय त्याची केमिस्ट्री कशी कळणार? पण आईन्स्टाईनला बुचकळ्यात टाकेल असा काहीसा प्रश्न ती त्याला विचारते. आता त्याला कळून चुकतं, हे खाल्ल्याशिवाय गत्यंतर नाही. कारण त्याने जर हे खाल्लं नाही तर ही बया याला खाणार. मग तो देवाचे नांव घेतो आणि ते तोंडात टाकतो. खाताना, बरं का, खाताना आपण चतुष्पाद प्राणी तर नाही ना असं सारखं त्याला वाटत राहतं. कारण ते जे काय असतं ना, ते सारखं मचक् मचक् करत गालातल्या गालात फिरत राहतं. घशाखाली उतरतच नाही. बायकोला मात्र वाटतं, आपला नवरा अगदी चवीचवीनं खातोय. शेवटी तो दोन ग्लास पाणी ढोसतो आणि सर्व घशाखाली उतरवतो.

तो पाणी पिऊन ग्लास खाली ठेवतो ना ठेवतो तोच तिचा प्रश्न, ''ओळखा पाहू, कशाचं बनवलं होतं?'' 'सुक्या गवताचं' असं त्याला ओरडून सांगावसं वाटतं पण तो त्याचा मोह टाळतो. कारण तसं म्हटलं असतं तर तिथे महासंग्राम झाला असता. संग्राम कसला, कत्लेआम झालं असतं. मग तो माणसाने खाण्यालायक दोन-चार पदार्थांची नावं घेतो आणि हरलो असं म्हणून हात वर करून मोकळा होतो.

'हरलात ना? हरलात ना? मला वाटलच होतं. तुम्हाला ओळखता येणार नाही म्हणून. अहो बटाट्याच्या आणि शिराळ्याच्या शिरा घालून बनवलं होतं.''

''व्वा! काय कॉम्बिनेशन.'' अर्थात हे सर्व मनातच.

''काय ग, कुठे शिकलीस हे?''

''अहो, ती बसुमती कोरगावकर आहे ना...''

''कोण ही बासमती?''

''अहो, बासमती नाही काही, बसुमती. धी फेमस बिवटीशियन.''

''ब्युटिशियन? हां, अग डाएटिशियन असेल.''

''हो, हो. तेच ते''

''बरं, मग तिच्याकडे गेली होतीस?''

''छे हो, दिवाळी अंकात ना तिची रेसिपी आली होती. वाचून दाखवू?''

''नको, नको.''

''अहो, अगदी सोपी आहे. हे बघा. एक बटाटा घ्यायचा. बरं का, अख्खा बटाटा घ्यायचा, साली काढायच्या. बटाटा फेकून द्यायचा.''

''मग एक शिराळा घ्यायचा...''

''अख्खा?''

'हो, एक अख्खा शिराळा घ्यायचा, शिरा काढायच्या. शिराळा फेकून द्यायचा.''

हो, हो, म्हणजे एक बायको घ्यायची. बरं का, एक अख्खी बायको घ्यायची. तिझ्या झिज्या उपटायच्या, बायको फेकून द्यायची. हे सगळं तो मनातच म्हणतो. पुढची रेसिपी त्याला ऐकवत नाही. काय तर म्हणे त्यात भरपूर विटॅमिन्स असतात. त्या बटाट्याच्या सालीमुळे त्वचा मुलायम होते आणि शिरांमुळे शिरा मजबूत होतात. खरं तर खाताना एवढं वाटलं नव्हतं, तेवढं ते साली आणि शिरा ऐकून सगळ्या नसा तटातट तुटतात की काय असं त्याला

(पान ५ कॉलम २ वर)

आठवणीच्या साठवणीतून

# हाताची घडी तोंडावर बोट

-डॉ. सुमन नवलकर

(१)

किती वेळ नुसते कोरे कागद पुढ्यात घेऊन बसले होते. एक तास-दोन तास. मधे उठून जेवले. मग जरा डुलकीही आली. पण उठल्यावरही कागद कोरा आणि पेनावर टोपण. 'हाताची घडी आणि तोंडावर बोट' या बालपणीच्या प्राथमिक शाळेतल्या वर्गातल्या बाईंच्या आज्ञेची आठवण झाली. घडी एकाच हाताची असायची आणि दुसऱ्या हाताचं दुसरं बोट तोंडावर. पण चूप थोडंच बसवतंय? ओठांपासून बोट थोडं दूर करायचं आणि हळूच बाजूच्या वर्ग मैत्रिणीशी बोलायचं. मग हळूच दुसऱ्या हाताची घडीही सुटायची. मैत्रिणीच्या टपलीत मारलं जायचं. तिची खोडी काढली जायची. मग मैत्रिणीच्या हाताची घडीही सुटलीच म्हणून समजायची. पाहाता-पाहाता सर्वांच्याच हातांच्या घड्या सुटायच्या. तोंडांवरची बोटंही निघायची. शिक्षकांचा अंदाज घेतला जायचा आणि कलकलाट चालू व्हायचा. हे सगळं बहुतेकदा नेहमीचे शिक्षक आलेले नसले आणि दुसरे बदलीचे शिक्षक वर्गावर आलेले असले कीच चालायचं. पण कधी-कधी बदलीचे शिक्षक नेहमीच्या शिक्षकांपेक्षाही वर्गाला शांत ठेवण्यात, वर्गाला शिस्त लावण्यात किंवा वर्गाला चार युक्तीच्या गोष्टी सांगण्यात कुशल असले, तर वर्ग खूप खुशीत असायचा. मुलांना उत्कंठा फार असायची, की रिकाम्या तासाला वर्गात बदली म्हणून कोण येतंय.

आमच्या शाळेत पारसनीसबाई गाणं शिकवायच्या. गोड रूप- गोड गळा-अंतरी नाना कळा- अशा पारसनीस बाई बदली म्हणून वर्गावर आल्या की आम्ही मुलं आनंदाने टाळ्या वाजवायचो. बहुतेकदा पारसनीसबाईंचा गाण्याचा तास नसला, तरीही त्या वर्गात आल्या की पाठोपाठ शिपाई पेटी घेऊन यायचाच. एका हाताने पेटीचा भाता हलवत, दुसऱ्या हाताची बोटं पेटीच्या सुरावटीवरून फिरवत त्या सुरांत आपले मधुर स्वर मिसळत पारसनीसबाई छान-छान गाणी म्हणायच्या. अख्ख्या तासात 'हाताची घडी आणि तोंडावर बोट' असं म्हणायची अजिबात वेळ यायची नाही. कधी-कधी त्या आमच्याकडूनही गाऊन घ्यायच्या. त्यांची ओळ म्हणून झाली की भात्यावरचा डावा हात उचलून त्या खुणेनेच आम्हाला ती ओळ म्हणायला सांगायच्या. मग आमचं सुरू. त्यांचा आवाज इतका मृदू असायचा की आमच्या कंठांमधूनही मृदू स्वरच बाहेर पडायचे आपोआप. कोणीही किंचाळायचं नाही.

आत्ता आठवलं! कुमुद- हो कुमुदच नाव होतं पारसनीसबाईंचं. कुमुद म्हणजे कमळ नाही का? कुमुदताई तशाच होत्या फुललेल्या कमळासारख्या. तळ्यात फुललेलं कमळ पाहून आपल्या ओठांच्या पाकळ्या नाही का आपोआप उमलतात? कमळांनी फुललेल्या तळ्याच्या काठावरून मख्ख चेहरा करून जाणारा माणूस मीतरी आतापर्यंत पाहिलेला नाही. तसं कुमुदताईंच्या तासाला हसरा चेहरा नसलेलं मूल नसायचंच.

मोकळा तास असला, की सर्वांना उत्कंठा असायची की 'बदली' म्हणून कोण येतंय. वर्गाच्या दारातून बाहेर डोकावलं, की व्हरांड्याच्या दुसऱ्या टोकाच्या शिक्षकांच्या खोलीतून शिक्षक बाहेर पडताना दिसायचे. प्रत्येक शिक्षकाच्या वेळी वाटायचं, आता हेच येणार आपल्या वर्गात. पण मग ते दुसऱ्या वर्गाच्या दारातून आत शिरले, की नजर पुन्हा शिक्षकांच्या खोलीच्या दाराकडे वळायची. त्या खोलीच्या दारातून कुमुदताई बाहेर पडताना दिसल्या की वर्गाच्या दाराशी उभ्या आमच्या खबऱ्याकडून समजायचं, की कुमुदताई येतायत. पण मधेच वाटेवरच्या दुसऱ्या वर्गात त्या शिरताना दिसल्या की खबऱ्या इवलंसं तोंड आतल्या बाजूला वळवून सांगायचा, 'नाही- कुमुदताई नाही येत- त्या 'दुसरी 'ब' मधे शिरल्या.' पण इतरत्र कुठेही न वळता, त्या थेट आमच्या वर्गात शिरल्या, की आमच्या आनंदाला पारावार राहात नसे. पेटी जर आधीच आणून शिपायाने टेबलावर ठेवलेली असली, तर मग दारातून वाकून बघायची गरजच नसायची. पालखी आली की देवी आलीच म्हणून समजायचं.

पण कधी-कधी कुमुदताई पेटीशिवायच यायच्या. पण तेव्हाही गोष्टी सांगायच्या, पेटीशिवायही गाणी म्हणायच्या. आम्हालाही गोष्टी सांगायला लावायच्या. गाणी म्हणायला लावायच्या. कोणाला ओरडणं नाही. चापटी मारणं तर दूरचंच. कोणीही कसल्याही तणावाखाली नसायचं. पण तरीही वर्गात शांतता असायची. कोणी न सांगताही हाताची घडी आणि तोंडावर बोट असायचं. ज्याचं- त्याचं आपलं आपणच. कारण बाईंनी सांगितलेल्या गमती, गायलेली गाणी ऐकायसाठी कान आतुरलेले असायचे.

आईची साडी गुंडाळून 'शिक्षक-शिक्षक' खेळ मी कधीही खेळले नाही. पण आजही कोणी विचारलं, की 'शिक्षक कसे असावे?'- तर ओठांवर कुमुदताईंचंच नाव येईल. एकदा आमच्या वर्गशिक्षिका काही दिवस रजेवर गेल्या होत्या. तेव्हा कुमुदताई काही दिवस आम्हाला मराठी शिकवायलाही होत्या. त्यामुळे अभ्यासही त्या छानच शिकवत, हेही ठाऊक होतं. कदाचित गणित शिकवत असत्या, तर त्या आवडल्या नसत्या का? मनात प्रश्न येतो. पण उत्तरादाखल वाटतं, की कुमुदताईंनी गणित शिकवलं असतं, तर कदाचित गणितही आवडायला लागलं असतं.

मनाच्या आतल्या- आतल्या छोट्याशा कप्प्यात कुमुदताई आजही घर करून आहेत. आपणही असू का असे कोणाच्या तरी मनाच्या आतल्या आतल्या छोट्याशा कप्प्यात घर करून? त्यासाठी मोठ्या मनाने वावरलं पाहिजे. जिथे जाऊ तिथे आनंद पेरला पाहिजे. तरच उगवेल आनंदाचं रोप. ते डवरेल आनंदफुलांनी. त्यांचा सुगंध सुगंधीत करेल आसमंताला. सुटेल हाताची घडी. निघेल तोंडावरचं बोटही. पण तरीही असू आपण शांत- स्तब्ध आणि आनंदात हरवलेले.

मो.८७७९१९४०४२

आठवणीच्या हिंदोळ्यावर

# कशासाठी पोटासाठी...

-त्वरिता संजय दळवी

दीपावली आणि त्या दीपोत्सवानिमित्त झालेली धावपळ नुकतीच थांबली होती. त्यात काही दिवसांपूर्वी एकटीने पुण्याला जाण्याचा योग आला होता. पुण्याला जाण्याच्या नुसत्या विचाराने जणू मला माझ्या नावप्रमाणे हालचाली करण्याची ऊर्जा मिळाली. मी लगबगीने रेल्वेच्या दोन तिकिटांचे 'ऑनलाईन' आरक्षण करून टाकले. एक मुंबईहून पुण्याला जाण्याची आणि दुसरी पुण्याहून मुंबईच्या परतीच्या प्रवासाची.

पुणे म्हणजे बालपण. पुणे म्हणजे मे महिन्यातील सुट्टी. पुणे म्हणजे मावशांच्या घरची मज्जा. पुणे म्हणजे मावस व मामे भावंडांबरोबर घालवलेला सर्वात सुखाचा काळ.

मी एकटीच प्रवास करणार म्हटल्यावर घरच्यांना जरा काळजीच वाटली. ओला किंवा टॅक्सीने माझा प्रवास विचारातच घेतला गेला नाही. कारण गाडी (कार) आणि गाडीतली मी म्हणजे बसल्याबसल्या झोप हे समीकरण ठरलेले आहे. बसचा प्रवास मला कंटाळवाणा वाटतो, म्हणून एशियाड बाद झाली. ट्रेन हे प्रवासासाठीचे माझे आवडीचे वाहन. झटपट प्रवास आणि पाय मोकळे करायची मुभा.

ठरलेल्या दिवशी प्रगती एक्सप्रेस पकडायला मी दादर स्टेशन गाठले. पाच नंबर प्लॅटफॉर्मवर तुफान गर्दी होती. लोकल आणि बाहेरगावी जाणाऱ्या गाड्या एकाच प्लॅटफॉर्मवर येत असल्यामुळे प्रवाशांची धावपळ सुरूच होती. माझी गाडी ठरल्या वेळेपेक्षा १० मिनिटे उशिराने आली. सामान जागेवर ठेवल्यावर मी आरामात माझ्या जागेवर बसले. एसी चेयरकारचा डबा असल्यामुळे गर्मी जाणवत नव्हती. एक एक स्टेशन मागे पडत होते आणि मला आठवू लागला लहानपणी केलेला प्रवास. पुण्याला जायचे म्हणून केवढा उत्साह. तेव्हाचा प्रवास सेकंड किंवा जनरल क्लासनेच व्हायचा. खिडकी मिळावी म्हणून कोण धावपळ. आम्ही भावंडे खिडकीची सीट वाटून घ्यायचो. कल्याण स्टेशनला गाडी थांबली की 'वडेवडे... गरम वडे' अशी साद यायची आणि त्या पाठोपाठ वड्यांचा खमंग वास गाडीत दरवळायचा. तोंडाला पाणी सुटायचे आणि पोटात आपोआप आग पडायची. वडे फस्त केल्यावर गोल्डस्पॉट दोघात वाटून प्यायची मजा काही औरच होती. थंड पेय विकणारे बालदीत बर्फ आणि त्यावर बाटल्या ठेऊन त्यांच्यावर चमचा असा काही फिरवायचे की काचेतून मस्त आवाज यायचा. पुढे कर्जतला 'काळीकाळी मैना, डोंगरची मैना' असे तालात गात करवंदे विकायला आदिवासी बायका यायच्या. कमरेपासून पोटऱ्यापर्यंत काष्ट्याची साडी आणि पुढ्यात गाठ मारलेली चोळी असा त्यांचा पहिराव असायचा. बदामाच्या हिरव्यागार पानांच्या द्रोणांवर काळ्या करवंदाचा डोंगर म्हणजे रानमेवा घेतला की 'कोंबडी का कोंबडा' हा खेळ खेळत पुढचा प्रवास मजेत जायचा. जर एक चावा मारल्यावर करवंद आतून सफेद असेल तर कोंबडी आणि लाल असेल तर कोंबडा. वाटेत लागलेल्या बोगद्यांची मजा काही औरच होती. बोगदा आला की 'ओ....' असे ओरडत काळोखातून धावणाऱ्या गाडीची लय धरत बच्चे कंपनी एक सुरात म्हणायची, 'कशासाठी-पोटासाठी- खंडाळ्याच्या घाटासाठी'. पाहायला गेलं तर निरर्थक बडबड गीत पण गाडी ज्या लयीत आणि ठेक्यावर धावते त्याच ठेक्यावर हे शब्द अगदी बेमालूम बसतात.

पुण्यात माझ्या दोन मावशा रहायच्या - ताईमावशी (अन्नपूर्णा पूर्णचंद्र राव) आणि बेबीमावशी (मीना बाळकृष्ण धुरंधर). ताईमावशी लोकमान्य नगरला रहायची तर बेबीमावशी नळ स्टॉपजवळ. माझा भाऊ व मी प्रथम ताईमावशीकडे राहायला जात असू. ताईमावशीचं घर तीन मजल्यांच्या बिल्डिंगमधील तळमजल्यावर होते. रस्त्यालगतच्या घरापुढ्यात छोटी बाग होती आणि बागेला मेंदीचे कुंपण होते. बागेतील फुले काढून मावशीला पूजेसाठी देण्यात कोण मजा येई. आमच्या नातेवाईकांत फक्त ताईमावशीकडेच स्वत:ची फोर्ड गाडी होती आणि आम्हा दोघा भावंडांना त्यात बसून फिरण्याचे केवढे अप्रूप होते. त्यांच्याच घरी आम्ही प्रथम प्रोजेक्टर पहिला होता. माझा मावसभाऊ अनिलदादा आम्हाला त्यावर एखादा छानसा माहितीपट लावून दाखवायचा तर कधी थेटरमध्ये आम्हाला इंग्लिश चित्रपट पहायला घेऊन जायचा. कधी पर्वतीवर तर कधी सारसबागेत ताईमावशी फिरायला घेऊन जायची. घरासमोरच्या लायब्ररीत एक आठवड्यासाठी का होईना माझे नाव नोंदवायला लावायची. मग मी रोज एक इंग्रजी पुस्तक वाचायची. एकट्याने रस्ता क्रॉस करायला मिळायचा म्हणून मला लायब्ररीत जायला मजा

(पान ४ कॉलम ४ वर)

**‘हर्ष’**

# पाठीराखा

-हेमंत तळपदे

तसे पाहता आपलं आयुष्य अनेक सुखद अन् दुखद घटनांची सरमिसळ असते. काही प्रसंग आपल्याला मोरपंखी सुखद अनुभव देतात. कधीकधी हे प्रसंग आपल्याला आकस्मिकपणे अनुभवास मिळतात. त्या सुखासाठी बऱ्याचदा आपण जरादेखील प्रयत्न केलेले नसतात. या सुखद अनुभवांचा अविष्कार आपल्या जीवनात का व कसा झाला याचे उत्तरही आपल्याकडे नसते. तर काही प्रसंग आपल्यावर वेगवेगळ्या आपत्ती घेऊन येतात. काहीवेळा तर हे प्रसंगच आपल्याला गंभीर शारीरिक अथवा मानसिक जखमाही करतात. तर काहीवेळा असे अपघात घडल्यावरही आपण कटू प्रसंगात सहीसलामतपणे बचावतो. त्यावेळी आपली आपल्या कुलदेवतेवर वा देवावर असलेली श्रद्धा अधिक दुणावते. हा देवच वा कुलदेवता आपले खरे पाठीराखे असतात. या विश्वात एक अनामिक शक्ति आपला सांभाळ करत असते. असे अनेक अनुभव आपणा सर्वांनाही आले असतील. आज मी माझ्या काही वैयक्तिक अनुभवांबद्दल सांगणार आहे.

वर्ष १९६५, डिसेंबर महिना. दोन महिन्यांनी म्हणजे ६ फेब्रुवारीला माझ्या मोठ्या आतेभावाचे लग्न चर्नी रोडलाच होते. आमचे नवीवाडी समोरील घर फार मोठे होते. त्यामुळे लग्नानंतर त्यांची वरात त्यांच्या मामांच्या घरी येणार असे ठरले होते. त्यामुळे माझे काकाजी व पप्पा घरसफाईकडे स्वतः लक्ष देत होते. आमच्या घरात त्यावेळी अक्कलकोट स्वामी, सिद्धारूढ स्वामी, दत्तगुरूंच्या मोठमोठ्या तसबिरी होत्या. त्या पुसून स्वच्छ करणे महत्त्वाचे काम होते. ती वेळ दुपारची होती. शाळेतून आल्यावर मी आमच्या प्रशस्त गच्चीमध्ये काकाजींच्या लाकडी खुर्चीवर चढून समोर रस्त्यावर लटकणाऱ्या इलेक्ट्रिक वायरवर झोल टाकत असे त्यावेळी दादीशेट अग्यारीच्या रस्त्यावरून धान्याचे वा इतर सामानांचे ट्रक जात असत. त्या गोणींवर मेहनत करणारे मामा बसलेले असत. मी वायरवरील झोलला ढील (सैल) देऊन त्या मामांच्या डोक्याला तो झोल स्पर्श करत असते. तेव्हा ते मामा भांबावून इकडे तिकडे पहात. तो माझा रोजचा खेळ होता. पण त्या दिवशी काहीतरी बिघडलेच.

काकाजींच्या लाकडी खुर्चीवर चढून मी झोलला ढील देण्यासाठी पुढे झुकलो त्यावेळी माझ्या वजनाने ती खुर्ची मागे सरकली व मी सरळ गच्चीचा कठडा ओलांडून खाली पडलो. त्यावेळी माझे वय अंदाजे ६ ते ७ वर्षे होते. मी खालच्या दुकानाच्या पत्र्यावरून घरंगळत खाली पडलो. खालच्या दुकानदाराने त्या पत्र्याखाली गोणीचे दुसरे छप्पर बांधले होते. ते फाडून मी रस्त्यावर पडलो. येथेच माझा पाठीराखा माझ्या मदतीस धावला. कोण, कसे काय मी वेडावाकडा न पडता सरळ हाताच्या पंजांवर रस्त्यावर पडलो व सर्कशीतल्या कसरतपटूप्रमाणे रस्त्यावर ढुंगणावर पडलो. समोरच्या पिठाच्या गिरणीत माझी ताई दळण घेण्यास गेली होती. त्या भैय्याने ओरडून, ‘तेरा छोटा उपरसे रस्तेपर गिरा है’ असे किंचाळून सांगितले. ती तशीच धावत सुटली. रस्त्यावरचे लोकही धावले. पण मी मात्र घाबरून केव्हा वर आलो व केव्हा मधल्या खोलीच्या बिछान्यावर अंग चोरून झोपलो ते आजही आठवत नाही. लोक घरात घुसले. कोणीतरी बर्फ आणला होता. पप्पांना आणि काकाजींना नक्की काय घडलंय हे कळण्यासही वेळ लागला. पण मी मात्र संपूर्णपणे सुरक्षित होतो. संध्याकाळी तो दुकानदार तावातावाने ओरडत घरी आला. अशा मुलांना चांगले चोपले पाहिजे वगैरे, वगैरे असे ओरडला. पप्पा व काकाजी मात्र शांत होते. माझ्या पाठीराख्याने मला मरणाच्या दारातून वाचवले होते.

असाच एक प्रसंग आजही डोळ्यासमोरून हलत नाही. लग्नानंतर मी, पत्नी व आमची आठ महिन्यांची छकुली बेडरूममध्ये झोपत असू. आईवडील त्यांच्या खोलीत असत. रात्रीचे दीड वाजले असावेत. आम्ही बेबीला बॉक्सबेडवर झोपविले होते. त्या बेडच्या उशाशी असणाऱ्या बॉक्सवर बिसलेरीची पाण्याची बाटली ठेवलेली असे. आम्ही दोघेही बॉक्सबेडच्या बाजूला जमिनीवर बिछाना टाकून झोपत असू. आमची छकुली झोपत लोळत खाली पडू नये म्हणून तीन उशाही बिछान्यावर लावल्या जात. ती रात्र अजूनही तशीच आठवते. आमच्या खोलीत तेव्हा ५६ इंच पात्यांचा मोठा सिलींग फॅन होता. रात्री १.३० वाजता तो सिलींग फॅन अचानक खाली कोसळला आणि वेगाने गरगरत बॉक्सबेडच्या कोपऱ्यावर आदळला. मोठा आवाज झाला. मला व माझ्या सौ.ला कोणीतरी गदगदून उठवतोय व कानात ‘वेडे, लवकर उठा’ अशी आरोळी देतोय असा भास झाला. आम्ही दोघेही दचकून उठलो. हिने दिवा लावला तो पाहतो तो काय, तो सिलींगफॅन आमच्या दोघांच्या पायाजवळ वेडावाकडा कलंडला होता. पाण्याने भरलेली बिसलेरीची बाटली अर्धी कापली गेली होती व थरथरत कंपने भरत होती. आमची छकुली मात्र शांतपणे पहुडली होती. एवढा मोठा वजनी पंखा वेगाने खाली कोसळूनही आम्हा तिघांपैकी कोणालाही खरचटले नव्हते. आजही त्या जाणीवेने अंगावर शहारे येतात. पण आमच्या पाठीराख्याने आमची पाठराखण केली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही साईबाबांच्या देवळात जाऊन पूजा केली व बाबांना शाल पांघरली.

अजून एक प्रसंग तंतोतंत डोळ्यासमोर तरळतो. वर्ष बहुधा १९९६ असावे. माझ्या मित्राचे लग्न झाले होते. त्याच्या लग्नाच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त मी माझ्या मित्रांना सहपरिवार घरी जेवण्यास बोलावले होते. त्यावेळी आम्ही मित्र कारने प्रथम भंडारदऱ्याला जाऊ व तेथे दूध जेवणाची सोय कशी आहे ते पाहून नंतर सर्वजण पत्नी, मुले बाळांसह भंडारदऱ्याला जाण्याचे ठरले. त्याप्रमाणे १४ ऑगस्टला आम्ही पाच मित्र महेंद्रच्या जीपमधून भंडारदऱ्याला निघालो. माझा मित्र जीप चालवत होता व मी त्याच्यासोबत पुढे बसलो होतो. बाकी तिघे मागील भागात बसले होते. दुपारी आम्ही एका धाब्यावर जेवलो तो शनिवार होता त्यामुळे मटण, मासे, दारु वगैरे टाळून आम्ही शाकाहारी भोजन केले. नंतर कसारा घाट सुरू झाला. पावसाची रिपरिप सुरू होती. त्यामुळे रस्ता ओला होता. कसे काय ठाऊक नाही पण एका वळणावर माझ्या मित्राचे जीपवरील नियंत्रण सुटले व आमची जीप घरंगळत वेगाने उजवीकडील डोंगर व रस्त्यामधील चरामध्ये कलंडली. ती जीप त्या डोंगरावर इतक्या जोराने आढळली की कोणीतरी कानफाटात मारल्यावर आपण सुन्न व्हावे तशी आमची अवस्था झाली. दोन मिनिटे कोणीही काहीही बोललोच नाही. नंतर मीच सर्वांना ‘सुखरूप आहात का?’ असे विचारले. व नंतर सर्वजण मागील दाराने रांगत रांगत बाहेर पडलो.

माझ्या पोटावर उजवीकडे मुकामार बसला होता. प्रत्येकाला कोठेनाकोठे थोडेफार खरचटले होते. फक्त एका मित्राच्या नाकातून रक्त वाहत होते. बाहेर आल्यावर आम्ही त्या जागेचे अवलोकन केले. खरोखरच आमच्या पाठीराख्याने आम्हाला तारले होते. कारण ती जीप जर डाव्या बाजूस घरंगळली असती तर आम्ही जीपसह जवळजवळ पाचशे फूट खोल दरीत फेकलो गेलो असतो. पण जर तुमचा पाठीराखा सजग असेल तर कोणतेही संकट टाळले जाते हे खरोखर सत्य आहे.

तर मंडळी, अशी अनेक संकटे आपल्याही जीवनात आपण अनुभवली असतील आणि या सर्वांतून आपणही अनेकवेळा बचावले असाल अशी मी आशा करतो. केव्हा केव्हा तर नुसते रस्त्यावर घसरूनही मोठेमोठे अपघात होतात पण दैव बलवत्तर असेल अन् पाठीराखा सक्षम असेल तर मोठ्या मोठ्या भयंकर संकटातही आपला निभाव लीलया लागतो हेच खरे. हे माझे वैयक्तिक अनुभव आहेत आपणांसही हे वाचून आपल्याशी झालेले काही प्रसंग आठवतीलच. व या पाठीराख्याने या संकटसमयी आपल्याला कसे तारले हे उमलेल. तेव्हा आज इतकेच सांगतो, ‘असेल माझा हरी तर सर्व संकटातून मज तारी’’

९८२१६०७५९३

*

---

(पान ३ कॉलम ४ वरून)

यायची.

ताईमावशीकडून आम्ही बेबीमावशीकडे जायचो. हनुमान टेकडीजवळील कीर्ती-शिल्पा नावाच्या बंगल्यात बेबीमावशीचे कुटुंब रहायचे. बुधूभावोजी नेहमी फिरतीवर असायचे. बेबीमावशी कित्येकदा त्यांच्यासोबत जायची. त्यावेळी मावशीच्या घरी सर्व मुलांचे राज्य असायचे. माझी मावसभावंडे, दिलीपदादा (सुरेन), प्रफुल्लदादा (नरेन) कुटुंबप्रमुखाची कर्तव्य सांभाळायची. शमा (सुलभा), मंगला, लता ह्या मावसबहिणी घर चालवण्याची जबाबदारी पार पाडायच्या, तर जिम (घरचा कुत्रा) सगळ्यांचे रक्षण करण्याचे काम करायचा. इतर मावसभावंडे म्हणजे सीमा (प्रिया) व कुंदन (संदीप) कोठारे आणि मामेभाऊ निलेश नायक त्यात आम्ही दोघे माझा भाऊ किरण (शशांक) आणि मी (प्रगती) असे सर्व मिळून त्या गोकुळात रंग भरायचो.

बेबीमावशीप्रमाणे मंगला सुग्रण. चवदार जेवण करावे ते मंगलाने, मोरळीवर कांदा व इतर भाज्या बारीक चिराव्यात त्या लताने, स्वच्छता करावी ती शमाने. हे माझ्यासाठी मापदंड होते. त्यांच्या घरी मी खूप काही शिकले. घरची स्वच्छता आणि टापटीप, कमीतकमी खर्चात घर चालवणे, सर्वांसोबत गुण्यागोविंदाने राहणे, उपलब्ध सामग्रीतून स्वादिष्ट पदार्थ करून सर्वांना खाऊ घालणे, बिनशर्त प्रेम करणे जिमने शिकवले. असे अनेक धडे मेच्या सुट्टीत शिकायला मिळाले जे मोठेपणी मला उपयुक्त ठरले.

शेंडेफळ म्हणून मी सर्वांची लाडकी होते. पण सर्वांची ‘हरकामी’ आणि गम्मत करण्यासाठीचे गिर्हाईकही होते. सर्व भावंडात चेष्टामस्करीसोबत भांडणेही व्हायची. पण आज भांडलो तरी उद्या एकत्रित खेळायचो. जिम, माझा सर्वात आवडता आणि लाडका सखा-सोबती होता. मीही त्याची जीवाभावाची होते. आम्ही दोघे सकाळी टेकडीवर फिरायला जायचो. दुपारी कधीकधी त्याला मी जेवण भरवायचे आणि तोसुद्धा लहान मुलासारखे आढेवेढे घ्यायचा. मग झोपायला मांडीत घ्यायचा हट्ट करायचा. आम्ही सगळे खूप मजा करायचो. फिरायला गेल्यावर काहीवेळा कुंदन, निलेश आणि किरण दुसऱ्यांच्या झाडावरचे आवळे दगड मारून पाडायचे, ते वेचून माझ्या फ्रॉकच्या ओच्यात भरायचे आणि मग लपतछपत आम्ही घरी येऊन ते

(पान ६ कॉलम ३ वर)

## प्रतिक्रिया

सुहासिनीजी नमस्कार, 'प्रभुतरुण' दिवाळी अंक वेळेवर पोहोचला आणि संपादकीयमधील ग्वाही प्रत्यक्षात उतरवत.... दीपावलीचा रेंगाळणारा दरवळ उत्तेजित झाला. लक्ष्यवेधी मुखपृष्ठ आणि सुबक बांधणीचा अंक, त्यातील नानाविध साहित्य आणि कला अविष्कार यामुळे वाचनीय आणि प्रेक्षणीयही झाला आहे. सर्वप्रथम छोट्या शिलेदारांना शाबासकी. त्यांच्या लेख आणि कवितांचे विषय, कल्पना... प्रभुतरुणाच्या भविष्याविषयी नक्कीच आश्वासक आहे. लेख, कथा, कविता, प्रहसन या लिखाणासोबतीला लिखीत प्रश्नोत्तरांतून व्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून नवा आयाम साधला आहे. 'जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर', ते ते वेचून सादर केल्याबद्दल आपले आणि आपल्या उत्साही चमूचे हार्दिक अभिनंदन.

श्री. अरविंद धराधर यांची 'नवल करी' संबंधित प्रतिक्रिया म्हणजे अनपेक्षित सुखद अनुभव होता. त्यासाठी श्री. धराधर यांचे मनापासून आभार.

**-मुकुला राणे नवलकर**

✳

Prabhu Tarun Diwali issue showcaseed by appropriate themed cover page.

My appreciation goes to innovative column blended fusion of non pathate prabhus concept one opposed by Prabhu Tarun.

Under the Lense - A picture clicked by Dhiren Ranjit stands out. I wish to add following names of photographers who have contributed to art of photography during the last century.

Late Shri M. V. VIjaykar
Late Shri S. G. Pradhan
Late Shri K. S. Vijaykar
Thanks,

**- Arvind Dharadhar**

✳

मुकुला राणे नवलकर आणि श्री. अरविंद धराधर यांचे प्रतिक्रिया दिल्याबद्दल मनापासून आभार. कारण त्यामुळेच भरारी घेण्यासाठी बळ वाढते. अरविंद धराधर यांनी जे विधान केले आहे, की प्रभुतरुणाने आंतरज्ञातीयांचा एकेकाळी विरोध केला होता. अरविंदजी, मी आपल्या माहितीकरिता सांगते की एकेकाळी हे धोरण असेल कदाचित. पण नंतर माझ्या कारकीर्दीत मी जाणीवपूर्वक काही बदल केले. उदा - 'प्रभतरूणा- च्या डायरीत' आंतरज्ञातीयांच्या विवाहाची नोंद स्वतंत्रपणे न करता 'नांदा सौख्यभरे' या शीर्षकाखाली एकत्रच करून कंसात (आं.ज्ञा.) अशी केली जाते. सौ. भक्ती प्रधान-शेटये ही आमची बराच काळ कार्यकारी संपादिका होती आणि सौ. वैजयंती कीर्तिकर-सक्सेना ही आजही या पदावर कार्यरत आहे. ऑगस्टमध्ये प्रभुतरुणाचा वर्धापनदिन साजरा झाला. त्यात 'थोडीशी मस्ती, थोडीशी थट्टा' करत एक गप्पांचा कार्यक्रम घेतला. त्यात पाठारे प्रभुंचे इतर ज्ञातीचे पाच जावई आणि इतर जातीतून आपल्या जातीत आलेल्या पाच सुना यांचा मजेशीर प्रश्नोत्तरांचा बहारदार कार्यक्रम घेण्यात आला. गंमत म्हणजे या सर्वांची मुलाखत घेणाऱ्यात श्री. बन्सी धुरंधरांसोबत प्रा. शिवानी देवरूखकरही होती. संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन भक्ती प्रधान-शेटये हिचेच होते. डॉ. सुमन नवलकर या आमच्या नियमित लेखिका आहेत. काळाबरोबर पावले टाकून प्रभुतरूण नेहमीच एक पाऊल पुढे राहिला आहे. अंकात मराठी बरोबरीने इंग्रजी लेखन घेण्यामागेही हाच उद्देश आहे. (अर्थात या उपक्रमाची सुरुवात कै. विहंग नायक यांनी केली म्हणून आज आपली प्रतिक्रियाही इंग्लीशमध्ये तशीच्या तशी घेण्यात आली.) असो. यापुढेही असाच निरंतर लोभ असावा.

**-संपादक**
**सुहासिनी कीर्तिकर**

✳

(पान २ कॉलम ४ वरून)

वाटू लागतं. तो विचार करतो, तो भोळासांब शंकर, त्याने हलाहल पचवलं म्हणे. पण त्याला म्हणावं आमच्यासारखा सल्‌-शिरा पचवून दाखव. स्वतःच्या जटा उपटून, नाही गंगेत उडी मारून जीव दिलास तर वनरा ही उपाधी लावणार नाही.

शेवटी तो अपेक्षित प्रश्न येतो. आता तमाम नवरे मंडळी, इकडे लक्ष द्या. गाफील राहाल तर फसाल. ती विचारते, ''आवडलं? आवडलं का?'' आणि ह्या साध्या प्रश्नाला तो जर म्हणेल, ''हो, आवडलं, छान-उत्तम!'' तर काय होईल? ताबडतोब त्या पदार्थाचा आग्रह होईल. इतकंच नाही, तर हे शिरा प्रकरण पुढल्या आठवडाभर रिपीट होईल. तेव्हा 'आवडलं का' या प्रश्नाला तो सावधपणे माफक हसतो आणि म्हणतो, ''हो, पण परत बनवू नको.''

''का? का?'' ती एकदम उसळून विचारते.

''अग, का म्हणजे, मी काय म्हणतो, मला काय म्हणायचं आहे, तू असं कर ना... उद्या एखादा नवीन पदार्थ बनव.''

वा! बायको खूश होते. तिला वाटतं, आपला नवरा किती हौशी आहे. नवीन पदार्थांची फर्माईश करतो. त्याचा एक हिशेब असतो. हे शिरा प्रकरण त्याने नुकतंच गिळलेलं असतं. तेव्हा त्या संकटापेक्षा उद्या एखाद्या नव्या संकटाला तोंड देऊ या. कदाचित त्यातून काहीतरी चांगलं निष्पन्न होईल अशी त्याची भाबडी आशा असते. नंतर तो मुत्सद्दीपणे बोलतो, ''हे बघ, तू खूप काम करतेस. असे नवीन नवीन पदार्थ बनवून तू थकत असशील. तेव्हा उद्या कांदाभजी वगैरे साधंच काहीतरी बनव.'' तिला बरं वाटतं. नवऱ्याला आपली केवढी काळजी.

पुढले काही दिवस उपमा, पोहे असं काहीतरी होत राहतं आणि परत कधीतरी एका काळ्या शुक्रवारी एक नवीन संकट बशीत बसून त्याच्या समोर येतं. मित्र हो, पाहिलंत? तोंड दाबून बुक्क्याचा मार म्हणतात, तो असा. बोलायचं नाही, चालायचं नाही, दुःख अक्षरशः गिळायचं. आम्हां नवरे मंडळींची ही व्यथा बायकांना सांगून नाही समजायची. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही असं म्हणतात. पण येथे हे घाव नवऱ्याला सोसावे लागतात. हे हलाहल त्याला पचवावं लागतं आणि सुगरणीचा मान मात्र गृहिणी मिरवत असतात. पहिल्या-वहिल्या फसलेल्या पाकक्रियेचा मूक साक्षीदार हा नवरा असतो. आणि म्हणूनच सुरुवातीला मी जे म्हणालो की, प्रत्येक सुगरण बायकोच्या मागे एक नवरा असतो, त्यात थोहासा बदल करून असं म्हणावसं वाटतं की, तो उभा नसतो, तर पुरा आडवा होतो.

# Sitara – The Explorer

--**Anaya Saxena** (age – 7 years)

"Sitara, do you know what is a monument?"

"Yes, I know dad!"

"Now listen to me, we are going on an adventure next week. We will take a train and go see the magnificient monument of Taj Mahal. "

Sitara was very excited. She could draw a train but she had never been on one! That night, she dreamt about a train that too her straight to the Taj Mahal. There she saw a big garden and a beautiful river.

Tring, Trring, Trringg, she woke up to her alarm ringing.

Sitara got up and went to the dining room where she saw her parents busy packing their bags for the vacation.

One week later, soon it was time to go visit the TajMahal. When they sat in the train Sitara asked her brother if he had ever been on a train before and if he had ever seen the Taj Mahal. He replied in the negative and asked her to look out of the window where they saw a dog running alongside the train. Finally, the train journey ended, and shortly they reached the great monument.

It was exactly like Sitara had seen in her dream. There was the big beautiful garden in which she and her brother ran around and played games. They had booked a room in a nice hotel to stay. The hotel offered yummy food and a big, warm swimming pool.

At the end of the vacation, Sitara and her family had a fun ride in the train back home. On reachin home, Sitara decided that she will grow up to become an explorer. Year after year passed and Sitara soon grew up with the same dream. She became an explorer and travelled to many beautiful untouched places.

## चुकीची दुरुस्ती

'प्रभुतरुण' दिवाळी अंकात श्री. सुनील जयकर यांचा छोटा लेख प्रसिद्ध करण्यात आला. त्यात संपादकीय अशा अनेक त्रुटी राहून गेल्या. हा लेख खरे तर लता मंगेशकरांच्या निधनानंतर दिलेली भाववंदना आहे. लता मंगेशकर यांना सुनील लतामावशी म्हणत असत. या लतादीदींनी आठवण म्हणून सुनीलना स्वतःची सही आणि जन्मतारीख लिहिलेले मनगटी घड्याळ म्हणून दिले होते. त्याचाच फोटो या लेखात आहे. या लेखात उल्लेखिलेली तारीख सहा फेब्रुवारी हवी होती. ती छापताना चुकली. फोटोतील लतादीदींची सही स्पष्ट यायला हवी होती. पण ते न घडले. प्रासंगिक औचित्य आणि भावनेच्या संदर्भात अतिशय मोलाच्या असलेल्या या लेखावर सुनील जयकर हे लेखकाचे नावही आडनाव काढून छापले गेले आणि अनुक्रमणिकेत ते अजिबातच आले नाही. या सगळ्या अनवधानाने घडलेल्या त्रुटींबद्दल मनापासून दिलगिरी व्यक्त करीत आहोत. श्री. सुनील जयकर यांचा मोठेपणा असा की त्यांनी हे सहृदयतेने समजून घेतले. त्याबद्दल आभार.

-संपादक

**परीक्षेतील सुयश**
**एम्. फार्म**
सौ. शुभ्रा सन्मान धुरंधर,
प्रथम श्रेणी

## 'प्रभु प्रभात'चा सोहळा

२० नोव्हेंबर २०२२ रोजी मुंबई मराठी साहित्य संघात 'प्रभु प्रभात' या मासिकाचा शताब्दीवर्ष सोहळा साजरा झाला. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे होते श्री. विकास मानकर. त्यांच्या हस्ते 'प्रभु प्रभात' दिवाळी अंकांचे प्रकाशन करण्यात आले. प्रभु प्रभातचे 'प्रभु प्रभात चिर प्रशांत उदयीरम्य आली' हे मुखरगीत सौ. रोनिका विजयकर, डॉ. सौ. अनिता राणे -कोठारे आणि पवन कीर्तिकर यांनी सुरेल सादर केले. तबल्यावर श्री. प्रदीप राणे यांची साथ होती. 'प्रभाता'चे अध्यक्ष श्री. कुंदन आगासकर यांनी वंदनीय कै. प्रमोद नवलकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यांचे प्रासंगिक महत्त्व म्हणजे 'प्रभाता'चे दीर्घकालीन संपादक असलेल्या प्रमोद नवलकरांचा हा स्मृतिदिन होता. 'प्रभात'च्या स्वाती राणे यांचे सुसंवादी निवेदन आणि संपादिका वृंदा जयकर यांचे मनोगत व्यक्त करणारे भाषण प्रसंगानुरूप होते. याप्रसंगी 'वासूची सासू'चा नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. यामागचे नाट्य आणि 'एकमेकां सहाय्य करू' या भावनेतून येणारी कलावंत म्हणून महनीयता माणुसकीला जागणारीच. 'हीच तर फॅमिलीची गंमत आहे' या नाटकाचा खरेतर प्रयोग होता, पण त्यातील कलावंत प्रियदर्शन कारंडे अत्यवस्थ झाल्यावर 'वासूची सासू'चे कलाकार मदतीसाठी धावून आले आणि प्रभाताचा रंगसोहळा साजरा झाला.

'प्रभाता'च्या शताब्दीवर्षाच्या या कार्यक्रमाला 'तरुण भारत', 'सामना', 'मिड-डे' सारख्या वृत्तपत्रात आणि 'एबीपी माझा'च्या बातम्यात प्रसिद्धी मिळाली. संपादक मंडळातील डॉ. अनीता राणे-कोठारे यांची या संदर्भातील मुलाखतही प्रसिद्ध झाली.

'प्रभात'ला 'प्रभुतरुणा'च्या मन:पूर्वक शुभेच्छा.

✳

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

१८-१०-२२ सौ. जुईली आणि श्री. आशीष विवेक देसाई, पुत्र
०३-११-२२ सौ. करिष्मा आणि डॉ. अमित चंद्रशेखर धैर्यवान, कन्या, घाटकोपर
०९-१२-२२ सौ. सारा आणि श्री. निहाल निखील अजिंक्य, कन्या, मुंबई

### आत्याबाई नाव बोला

०९-१२-२२ कु. ऐशा निहाल अजिंक्य

### नारळ साखर दिला

१७-१२-२२ श्री. अमेय निलेश राणे कु. प्रियांका प्रशांत देवरुखकर (आं.ज्ञा.)

### नांदा सौख्यभरे

१०-११-२२ कु. निकिता अजित मोरेश्वर जयकर श्री. अद्वैत संजय निरगुडकर (आं. ज्ञा.)
२६-११-२२ कु. श्रुती शैलेश कृष्णराव जयकर श्री. डाविन एलेन मॅथ्युज (आं. ज्ञा.)
३०-११-२२ श्री. राज सुरेंद्र राणे कु. चैताली चक्रबोर्ती (आं.ज्ञा.)
१६-१२-२२ कु. अनिल त्रिलोकेकर श्री. अनिकेत एकनाथ वाकधरे (आं. ज्ञा.)

### विवाहाचा माणिक महोत्सव

२०-१२-२२ श्री. प्रदीप मधुकर मानकर कु. प्रीत मधुकर मानकर

### विवाह सुवर्ण महोत्सव

०७-१२-२२ श्री. दिलीप नारायण नवलकर कु. साधना केशवराव धैर्यवान
०१-१२-२२ श्री. दीपक माधव धैर्यवान कु. नीलन पुष्पराज नवलकर

### विवाह हिरक महोत्सव

१९-१२-२२ डॉ. उल्हास चिंतामणी धैर्यवान कु. नीला मनोहारी तळपदे

### शतक वर्ष पूर्ती

२१-१२-२२ श्रीमती डेझी मनोहर राणे

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २४-१०-२२ | श्रीम. लता अजिंक्य, | वय ९४, | दादर |
| ०९-११-२२ | श्रीम. शीला मोतीराम नवलकर, | वय ८०, | विलेपार्ले |
| १६-११-२२ | श्री. तेजपाल रमाकांत कोठारे, | वय ८८, | खार |
| २०-११-२२ | सौ. विद्या प्रफुल्ला कोठारे, | वय ८०, | विलेपार्ले (प.) |
| २७-११-२२ | रजनी (कुमुदिनी) चित्रसेन अजिंक्य, | वय ९२, | पुणे |
| ३०-११-२२ | श्री. उल्हास वसंतराव नवलकर, | वय ७७, | माहिम |
| ११-१२-२२ | कु. मीना मोरेश्वर प्रधान, | वय ९०, | खार (लिंकिंग रोड) |
| १७-१२-२२ | श्री. नंदकुमार मल्हार व्यवहारकर | वय ८८ | ठाणे |
| २१-१२-२२ | श्रीम. सीमा रविन तळपदे | वय ८६ | (राणेवाडी) अंधेरी |
| २४-१२-२२ | श्रीम. उज्ज्वला (प्रतिमा) बळीराम आनंदकर | वय ९४, | (कोंडवा), पुणे |

## प्रभुतरुणास देणगी

✶ नूतन विजय देसाई आणि रजुला विजय देसाई यांजकडून प्रभुतरुणाच्या शताब्दी वर्ष प्रारंभानिमित्त रु. १०,०००/-

✶ सौ. नीलन आणि दीपक माधव धैर्यवान यांजकडून दिनांक १० डिसेंबर २०२२ रोजी साजऱ्या झालेल्या त्यांच्या विवाहाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त रु. २००१/-

देणगीदारांचे मन:पूर्वक आभार

## अभिनंदन

✶ डॉ. सुमन नवलकर यांचे लेखन पंधरा दिवाळी अंकात प्रसिद्ध झाले (गेल्या अंकात हा आकडा अनवधानाने कमी टाकला गेला होता.)

✶ कल्पना कोठारे यांची 'हेमांगी' दिवाळी अंकात कविता प्रसिद्ध झाली.

✶ दीपावलीनिमित्त श्रीमती नीरजा तळपदे यांची 'सणांची राणी दिवाळी आली' ही रचना श्री. मिलींद द. करमरकरांच्या संगीताने सजून सौ. स्मृती तळपदे आणि चमुने सादर केली.

✶ २६-११-२०२२ रोजी 'हिस्टरी ऑफ इंडियन कॉन्स्टिटयूशन' वरील चर्चासत्रात सॉलि. राजन जयकर यांचे अभ्यासपूर्ण भाषण झाले. हे चर्चासत्र 'प्रोग्रॅम फॉर लिगल एज्युकेशन ॲण्ड अवेअरनेस' तर्फे आयोजित केले होते. तसेच एशियाटिक सोसायटीच्या स्थापनादिनानिमित्त त्यांचे 'द बेसिक स्ट्रक्चर ऑफ फाऊंडेशन' या विषयावर व्याख्यान झाले.

✶ डॉ. परेश नवलकर यांनी पार्लमेंट हाऊसमध्ये देशाच्या आरोग्यमंत्र्यांची भेट घेतली.

✶ दि. १५-१२-२२ रोजी नाडकर्णी बालकल्याण केंद्र, विलेपार्ले येथे 'दिलासा'च्या अध्यक्ष आणि निवृत्त न्यायाधीश 'कुटुंब न्यायालय' बागेश्री परीख यांचे 'कवचकुंडले कायद्याची' या विषयावर व्याख्यान झाले.

✶ 'सनवर्ल्ड फॉर सिनीयर्स, पुणे' या संस्थेतर्फे काव्यपूर्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात श्री. नंदकुमार विजयकर यांना द्वितीय पारितोषिक लाभले. 'मुंबई जिऑग्राफी' तर्फे जहांगीर आर्ट गॅलरीत छायाचित्र प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनासाठी दोनशेहून अधिक फोटो आले होते. त्यातून फक्त चाळीस निवडले गेले. यामध्ये नंदकुमार विजयकरांच्या फोटोचा समावेश होता. त्याबद्दल त्यांना प्रशस्तीपत्रक लाभले.

✶ जानेवारी २०२३ मध्ये होणाऱ्या सौंदर्यवती स्पर्धेसाठी न्यूजर्सी येथील महाराष्ट्र मंडळाने निवड प्रक्रिया पार पाडली. त्यात जान्हवी सुजन राणे यांची निवड झाली आणि त्यांचा सत्कार करण्यात आला. ही स्पर्धा सोफिया, बल्गेरिया येथे होणार आहे.

✶ २३ ते २५ डिसेंबर या कालावधीत पुणे येथे नाणी आणि पोस्टांच्या तिकीटांचे प्रदर्शन भरविण्यात आले. त्याचे उद्घाटन सॉलि. राजन जयकर यांच्या हस्ते झाले.

✶ नोयडा येथे भरलेल्या टीइडीएक्स परिषदेत डॉ. अंबरीष विजयकर यांनी होमियोपथीमधील गुरू आणि त्यांचे वडील डॉ. प्रफुल्ल विजयकर यांचा वारसा सांगितला. डॉ. अंबरीष यांना होमियोपथीतील संभाजी महाराज मानले जाते.

✶ कै. श्रीपाद शामराव जयकर यांनी काढलेले लोकमान्य टिळक, रामदासस्वामी आणि राजे शिवाजी यांची वदने असलेले दत्तात्रेय त्रैमूर्तीचे चित्र विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा संघात विराजमान आहे. काही वर्षांपूर्वी प्रभुतरुणाच्या दिवाळी अंकाचे मुखपृष्ठही या चित्राने सजले होते. या चित्राची दखल पु.ल. देशपांडे यांनी 'गणगोत' मध्येही घेतली होती. कै. श्रीपाद जयकरांची काढलेली साईबाबांनी कृपावंत होऊन श्रीपाद यांना बैठक दिली होती. किंबहुना साईबाबांनीच त्यांना आपले चित्र काढण्याकरिता प्रवृत्त केले होते. हे सारे आठवण्याचे खास कारण म्हणजे लोकमान्य सेवा संघातील त्यांच्या चित्राचे हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. 'परि कीर्तिरूपे उरावे' असा हा सोहळा. त्यांना कृतज्ञ मानवंदना!

वरील सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन. सुयोग असा की डॉ. सुमन नवलकर आणि श्री. नंदकुमार विजयकर हे या महिन्यापासून आपले सदर लेखक आहेत.

(पान ५ कॉलम ४ वरून)

आवळे बेबीमावशीला द्यायचो. ती त्याचा मुरुंबा करायची. अंगतपंगत करून जेवायला एकत्र बसायचो. आंबे खाताना त्याचा बाठा सर्वात सफेद कोण करतो ह्याची पैज लागायची. स्वत:ची पाने स्वत: परसातील हौदाजवळ नेऊन ठेवायचो. दुपारी पत्त्यांचे डाव मांडून 'चॅलेंज' खेळताना भांडायचो. संध्याकाळी घराबाहेरील पटांगणात क्रिकेट किंवा बॅडमिंटन खेळून दमायचो. कधीकधी दुपारी आमची फौज सिनेमा बघायला निघायची. परत आल्यावर नळ स्टॉपला रसवंतीगृहात जाऊन थंडगार उसाचा रस पिण्यात काय मजा असायची. रसवालेदादा सफेद धोतर, शर्ट आणि टोपी घालायचे. लाकडी चरकाचा दांडा फिरवत गाणे गात ते उसाचा रस काढत. रात्रीच्या जेवणानंतर अंताक्षरी खेळायचो. रेडिओवर गाणी आणि इतर कार्यक्रम ऐकत सगळे हॉलमध्ये पथारी पसरायचे. कुणी तोंड उघडे ठेऊन झोपला तर त्याच्या तोंडात मीठ घालण्याचा वात्रटपणा केला जायचा. अशा गमती-जमतीत मे महिना कधी उडून जायचा कळायचेच नाही.

गेलेले हे मोलाचे दिवस प्रयत्न करूनही मी परत जगू शकत नव्हते. गाडीचा प्रवास करू शकत होते म्हणून तसा प्रयत्न मात्र मी केला. पण एसी चेअरकारच्या बंद खिडक्यांतून निसर्गाचे वारे चेहऱ्यावर खेळू शकले नाहीत. कल्याणला आलेल्या वडेवाल्याला पूर्वीचा तोंड वेंगाडून 'वडेवडे...' बोलणाऱ्या विक्रेत्याची सर आली नाही. गाडी कर्जतला थांबलीच नाही त्यामुळे डोंगरची मैना डोंगरावरच राहिली. एक्स्प्रेस ट्रेन वेगात दौडत होती पण आठवणीतली लय हरवली होती. बोगदा आल्यावर मी खिडकीबाहेर तोंड फिरवून मनातल्या मनात म्हणत राहिले, 'कशासाठी पोटासाठी ...!!!'

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67